Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 22 October 2024

Time: 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: २२ ऑक्टोबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

रशियात कझान या शहरात आयोजित १६ व्या ब्रिक्स शिखर परिषदेला उपस्थित राहण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी रवाना झाले. ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या पाच देशांच्या ब्रिक्स समूहाची ही शिखर परिषद आजपासून सुरू होत आहे. केवळ जागतिक विकास आणि सुरक्षेसाठी बहुपक्षीयवादाचं बळकटीकरण अशी यावेळच्या या परिषदेची मध्यवर्ती संकल्पना आहे. या परिषदेत विविध विषयांवर विस्तृत चर्चा करण्यासाठी तसंच विविध नेत्यांची भेट घेण्यासाठी उत्सुक असून, ही रशिया भेट, उभय देशांमधल्या धोरणात्मक भागीदारीला अधिक बळकट करेल, असं पंतप्रधान मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

****

विधानसभा निवडणुकीसाठीची अधिसूचना आज जारी होत आहे. या पार्श्वभूमीवर राज्यभरात नामनिर्देशन प्रक्रियेला आजपासून प्रारंभ होत आहे. येत्या २९ तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार असून, ३० तारखेला अर्जांची छाननी होणार आहे. चार नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत. नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी याच वेळापत्रकाप्रमाणे नामनिर्देशन प्रक्रिया पार पडणार आहे. सर्व ठिकाणी २० नोव्हेंबर रोजी मतदान आणि २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

****

झारखंडमधल्या विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या ३८ जागांसाठीही आज अधिसूचना जारी झाली. इथंही महाराष्ट्राप्रमाणेच अर्ज भरणं आणि मतदानाचं वेळापत्रक आहे. झारखंडमध्ये पहिल्या टप्प्यातले अर्ज भरायची सुरुवात १८

तारखेलाच झाली असून अंतिम मुदत शुक्रवारपर्यंत आहे. पहिल्या टप्प्यात १३ नोव्हेंबरला मतदान होणार आहे.

****

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरायला आजपासून सुरुवात होत असली तरी महायुती आणि महाविकास आघाडीचं जागावाटप अजून जाहीर झालेलं नाही. भाजपाने ९९ जागांवर, तर वंचित बहुजन आघाडीनं ८३ जागांवर उमेदवार जाहीर केले आहेत. परिवर्तन महाशक्तीचे दहा, मनसेचे दोन उमेदवार आतापर्यंत जाहीर झाले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस, एमआयएम, समाजवादी पक्ष यांनीही काही उमेदवार जाहीर केले आहेत.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसनं आपल्या आघाडीच्या २७ प्रचारकांची यादी काल जाहीर केली. यात पक्षाचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे, ज्येष्ठ नेते मंत्री छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडे, हसन मुश्रीफ, विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, आदींचा समावेश आहे.

****

जळगाव जिल्ह्यातल्या मुक्ताईनगर इथं काल शिवसेनेचे मुख्य नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत महायुतीचा मेळावा झाला. यावेळी मुक्ताईनगरचे आमदार चंद्रकांत पाटील यांनी शिवसेनेत प्रवेश केला. यानंतर एकनाथ शिंदे यांनी महायुतीतर्फे त्यांची उमेदवारी जाहीर केली.

****

नांदेड शहर तसंच अर्धापूर, हदगाव या तालुक्यात आज सकाळी सात वाजेच्या सुमारास भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. या भूकंपाची तीव्रता रिष्टर स्केलवर तीन पूर्णांक आठ इतकी नोंदवण्यात आली. भूकंपाचा केंद्रबिंदू नांदेड शहरापासून २९ किलोमीटर दूर उत्तरपूर्व दिशेला हदगाव तालुक्यातल्या सावरगाव या गावात आहे. नांदेड शहर आणि परिसर तसंच हिंगोली जिल्ह्यातल्या कळमनुरी, वसमत, औंढा तालुक्यातल्या अनेक भागातही हे धक्के जाणवले.

****

नाशिक इथल्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे विद्यार्थ्यांकरता ‘मनसंवाद’ या मानसिक आरोग्य हेल्पलाइनचा शुभारंभ कुलगुरू लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर यांच्या हस्ते करण्यात आला. युवकांमध्ये अपराधीपणाची भावना आणि तणावग्रस्तता वाढत असल्याचं निदर्शनास आलं असून, त्याचं निवारण करण्यासाठी विद्यापीठात चिकित्सा मानसतज्ज्ञांची नेमणूक करण्यात आली आहे. विद्यापीठाच्या

संलग्रित महाविद्यालयातल्या विद्यार्थ्यांनी *84 85 09 23 50* या मनसंवाद हेल्लाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असं आवाहन करण्यात आलं आहे.

****

धाराशिव शहरातल्या खड्ड्यांच्या विरोधात जिल्हा व्यापारी महासंघाच्या पुढाकारातून विविध ३६ संघटनांनी काल शहरात बंद पाळला होता. मागील तीन वर्षांपासून शहरातले सर्व प्रमुख आणि अंतर्गत रस्त्यांची स्थिती गंभीर आहे. वेळोवेळी नागरिक, विविध संघटनांनी याबाबत आवाज उठवला, मात्र प्रशासनाने गंभीर दखल न घेतल्यामुळे हा बंद पाळण्यात आला आणि जिल्हाधिकारी कार्यालयावर मूक मोर्चा काढण्यात आला. मोठ्या संख्येनं नागरीक या मोर्चात सहभागी झाले होते.

****

हिंगोली इथल्या माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयातल्या वरिष्ठ लिपिकाला नवीन संगणक मान्यतेच्या प्रस्तावाच्या तपासणीची संचिका सादर करण्यासाठी १० हजार रुपये लाच घेताना काल रंगेहाथ पकडण्यात आलं. गजानन पळसकर असं या लिपिकाचं नाव असून, त्याच्याविरोधात हिंगोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

१४ वर्षे वयोगटातल्या मुला – मुलींच्या राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धाना काल नाशिकमध्ये सुरुवात झाली. राज्याचं क्रीडा आणि युवक सेवा संचालनालय तसंच नाशिक जिल्हा क्रीडा परिषदेच्या वतीने या स्पर्धा घेण्यात येत आहेत. जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी या स्पर्धेचं उद्घाटन केलं. मुलांच्या गटात कोल्हापूर आणि लातूर विभागाच्या संघांनी आपले दोन सामने जिंकून उपांत्य फेरी गाठली. तर मुलींच्या गटात कोल्हापूर, नागपूर, लातूर आणि पुणे या संघांनी विजयी सुरवात केली.

****